# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१२३६/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. जितेंद्र भगवान वाल्हे,<br>रा. प्लॉट नं. ३९-अ, गुरु गणेश नगर, मोराणे (प्र.ल.),<br>ता .जि .धुळे- ४२४००२. | जन माहिती अधिकारी,<br>प्रियदर्शनी इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,<br>म्हळसर, ता. शिंदखेडा,<br>जि. धुळे- ४२५४०३. | मुख्याध्यापक,<br>प्रियदर्शनी इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हळसर,<br>ता. शिंदखेडा,<br>जि. धुळे- ४२५४०३. |

**सुनावणी दिनांक — २२/०५/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २४/०१/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अर्जात मागणी केलेली माहिती चुकीचे कारण नमूद करुन तसेच दिशाभूल करणारे तथ्यहीन भाष्य करुन अडथळे निर्माण केले आहेत., आजतागायत माहिती पुरविण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात सुनावणीत वस्तुस्थितीवर आधारित समन्यायिक स्वरुपाचा आदेश/निर्णय आजतागायत पारित केलेला नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : संबंधितावर शिस्तभंगाची कारवाईसाठी शिफारस सक्षम/नियुक्ती प्राधिकरण यांच्याकडे करण्यात यावी. रु. ५०००/- नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत. विनामूल्य माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २२/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१२ ते २०२१

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : आपल्या संस्थेच्या मार्फत चालवण्यात येणाऱ्या सर्व युनिट/ शाळा यांच्या कर्मचाऱ्यांची बिंन्दु नामावली व कर्मचाऱ्यांच्या नावाची

यादी, त्यांचे पद, त्यांचा प्रवर्ग, नियुक्ती दिनांक तसेच अनुशेष बद्दल संपुर्ण माहिती तीही लेखी माहिति पुरवण्यात यावी.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. २२/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आपण आपल्या अर्जात मागणी केलेली माहिती ही कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वरुपाची आहे. माहिती अधिकार अधिनियम कलम ८ नुसार अशी वैयक्तिक स्वरुपाची माहिती संबंधित व्यक्तीच्या संमती शिवाय देता येत नाही. आणि अशी संमती संबंधीत व्यक्तीनी मला दिलेली नाही. तसेच वैयक्तिक स्वरुपाची माहिती देऊ नये. याबद्दल अनेक शासन निर्णय वेळोवेळी प्रदर्शित झालेले आहेत. कोणतीही माहिती मागणी करतांना एका अर्जात एकाच विषयाशी संबंधीत माहिती मागविणे आवश्यक आहे. अपेक्षित वेगवेगळया विषयासाठी वेगवेगळे स्वतंत्र अर्ज अपेक्षित आहेत. याबद्दल देखील शासनाने वेळोवेळी परीपत्रके काढली आहेत. आपल्या अर्जात आपण विविध वेगवेगळ्या विषयांची माहिती एकाच अर्जात मागणी केली आहे. याकारणास्तव देखील आपला अर्ज अवैध आहे. सर्व मुद्यांचा विचार करता आपण मागणी केलेली माहिती आपल्या अर्जानुसार देता येणार नाही. असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २५/१०/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५/१०/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही. अथवा कुठलाही पत्रव्यहार केला नाही. माहिती देणेस टाळाटाळ करणे.

(४) **अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३/११/२०२१ रोजी अपिलार्थी यांनी दाखल केलेले प्रथम अपिल हे प्रिमॅच्युअर्ड व खोटे नमूद केल्यामुळे बेकायदेशिर आहे. त्यामुळे ते अपिल गुणवत्तेवर कोणताही निकाल न देता कार्यक्षेत्राच्या मुद्यावर फेटाळण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा** — सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २२/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अपिल फेटाळले आहे.

**६. निष्कर्ष** —

१. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सुमारे १० वर्षाची असल्याने माहितीचा कालावधी विस्तृत व व्यापक स्वरुपाचा होत आहे.

२. अपिलार्थी यांनी केलेल्या माहिती अर्जात २०१२ ते २०२१ असा कालावधी नमूद केला असून २०१२ च्या कोणत्या दिनांकापासून व २०२१ च्या कोणत्या दिनांकापर्यंतची माहिती हवी आहे तो दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे माहितीचा अर्ज मोघम होत आहे.

३. अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २२/१०/२०२१ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले असल्याचे दिसून येते.

४. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून येते.

५. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दाखल केलेले प्रथम अपिल अर्ज बेकायदेशीर व प्रिमॅच्युअर्ड असल्यामुळे फेटाळल्याचे दिसून येते.

६. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २२/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये एकापेक्षा अधिक विषयांची विस्तृत व व्यापक स्वरुपाची संकलित करावी लागणारी माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) व माहिती अधिकार अधिनियम (सुधारणा) नियम २०१२ च्या कलम ३ (क) नुसार ही माहिती देणे अभिप्रेत नाही.

७. अपिलार्थी सुनावणीस उपस्थित असून त्यांना सुनावणीवेळी कोणते कारण चुकीचे व कोणते दिशाभुल तथ्यहीन भाष्य करुन अडथळे निर्माण केले याबाबत काहीही सांगता आलेले नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक १२३६/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. ६५८० 29 AUG 2025